TATA
TATA POWER

# कार्यकारी सारांश

# बहुवर्षीय वीजदर (एमवायटी) याचिका

# टाटा पॉवर - पारेषण

## प्रकरण क्र. २०२४ चा १८५

Lighting up Lives!

## कार्यकारी सारांश

### 1.1. टाटा पॉवर- पारेषण ऐतिहासिक दृष्टीकोन

1. टाटा पॉवर कंपनी लिमिटेड ("टाटा पॉवर") ही कंपनी १९१९ साली स्थापन झालेली आहे. १ एप्रिल २००० रोजी टाटा हायड्रो- इलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कंपनी लिमिटेड (१९१० मध्ये स्थापन झालेली) आणि आंध्र व्हॅली पॉवर सप्लाय कंपनी लिमिटेड (१९१६ साली स्थापन झालेली) या दोन्ही कंपन्यांचे टाटा पॉवरमध्ये विलिनीकरण करून एक एकात्मिक कंपनी स्थापन करण्यात आली. या विलिनीकरणानंतर उक्तनिर्देशित कंपन्यांच्या परवान्यांचेही विलिनीकरण करण्यात आले आणि टाटा पॉवरला महाराष्ट्र शासनाकडून त्यांच्या मुंबई परवाना क्षेत्रातील जनतेला वीजपुरवठा करण्यासाठी आणि वीज वितरण परवानाधारकांना मोठ्या प्रमाणावर वीजपुरवठा करण्यासाठी दिनांक १२ जुलै २००१ रोजीचा ठराव क्र. आयईए-२००१/ सीआर- १०५०९/ एनआरजी-१ नुसार परवानगी देण्यात आली.
2. उक्तनिर्देशित परवाने १५ ऑगस्ट २०१४ पर्यंत वैध होते. त्यानंतर टाटा पॉवरच्या पारेषण उद्योगाकडून (टाटा पॉवर- टी) खटला क्रमांक २०१४ चा ११२ मध्ये पारेषण परवाना प्रदान करण्यासाठी अर्ज दाखल करण्यात आला. माननीय आयोगाने १४ ऑगस्ट २०१४ रोजी टाटा पॉवरला मुंबई क्षेत्रात आणि बाहेरील परिसरात टाटा पॉवरच्या मालकीच्या किंवा भविष्यात टाटा पॉवरकडून बांधल्या जाणाऱ्या आणि मालकी घेण्यासाठी प्रस्तावित असलेल्या आणि महाराष्ट्राच्या आंतर राज्य पारेषण यंत्रणेचा भाग असलेल्या पारेषण वाहिन्या आणि रिसिव्हिंग केंद्रांना (किंवा पारेषण रिसिव्हिंग केंद्रे) १६ ऑगस्ट २०१४ पासून २५ वर्षांच्या कालावधीसाठी पारेषण परवान्याची मान्यता दिली होती.
3. माननीय आयोगाने टाटा पॉवर-टीच्या पारेषण परवाना क्र. २०१४ चा १ मध्ये त्यांच्या दिनांक १ ऑगस्ट २०१८ रोजीच्या प्रकरण क्र. २०१६ चा १३७ मधील आदेशान्वये बदल (पहिला बदल) केला होता.
4. त्यानंतर, माननीय आयोगाने टाटा पॉवर-टीच्या पारेषण परवाना क्र. २०१४ चा १ मध्ये दिनांक ११ मार्च २०२१ रोजीच्या प्रकरण क्र. २०१९ चा २४९ मधील आदेशान्वये बदल (दुसरा बदल) केला आहे.
5. तसेच, माननीय आयोगाने टाटा पॉवर-टीच्या पारेषण परवाना क्र. २०१४ चा १ मध्ये दिनांक ३० मे २०२३ रोजीच्या प्रकरण क्र. २०२२ चा ८९ मधील आदेशान्वये बदल (तिसरा बदल)

केला आहे आणि त्यानंतर दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजीच्या प्रकरण क्र. २०२४ चा १३ मधील आदेशान्वये चौथा बदल केला आहे.

**1.2. टाटा पॉवर पारेषणचे कार्यान्वयन**

6. टाटा पॉवरचा पारेषण उद्योग (टाटा पॉवर-टी) हा महाराष्ट्रातील पारेषण परवानाधारकांपैकी एक आहे आणि मुंबईतील त्यांच्या कार्यान्वयनाची १०० वर्षे पूर्ण झाली आहेत. कार्यान्वयनाच्या या वर्षांच्या कालावधीत टाटा पॉवर-टीने सातत्याने मुंबईतील आणि आसपासच्या परिसरातील ग्राहकांसाठी विश्वासार्ह व तंत्रज्ञानदृष्ट्या प्रगत आणि दर्जात्मक पारेषण जाळे उपलब्ध असेल याची काळजी घेतली आहे.

7. तसेच, टाटा पॉवर- टी ही राज्य पारेषण कंपनी (एसटीयू) ची भागीदार असून त्याद्वारे ग्रिड स्थिरता, विश्वासार्हता राखणे, पारेषण जाळ्यांची क्षमता वाढवणे, मार्गांच्या हक्कांच्या समस्यांचा, कायदेशीर समस्यांचा सामना करणे, वैधानिक मान्यतांचा वेग वाढवणे, डोंगराळ आणि जंगली मार्गातील भौगोलिक समस्या सोडवण्यासाठी उपाययोजना काढणे, सीआरझेड निर्बंध, रेल्वे क्रॉसिंग, विमान पदपथ निर्बंध इत्यादी बाबींवर उपाय काढून प्रकल्पांची वेगवान पूर्तता होईल याची काळजी घेतली जाते.

8. ग्राहकांना वीजपुरवठा करण्यासाठी पारेषण जाळे निर्मिती केंद्रे आणि भारकेंद्रांमधील एक महत्त्वाचा दुवा ठरतात. पारेषण उद्योगात रिसिव्हिंग स्टेशन्स आणि पारेषण वाहिन्यांचा समावेश आहे. टाटा पॉवर-टीची रिसिव्हिंग स्टेशन्स मुंबईमध्ये आणि आसपासच्या परिसरात स्थित आहेत. विविध उच्च दाबाच्या पारेषण वाहिन्या ज्यात ईएचव्ही भूमिगत वाहिन्या/ मार्गिका यांचा समावेश आहे, त्या मुंबई आणि आसपासच्या परिसरात पसरलेल्या आहेत आणि त्या टाटा पॉवरच्या महाराष्ट्रातील औष्णिक तसेच जलविद्युत निर्मिती केंद्रांशी जोडलेल्या आहेत. ईएचव्ही केबल्ससह रिसिव्हिंग स्टेशन्स आणि पारेषण वाहिन्यांचे जाळे टाटा पॉवर-टीचे कौशल्यपूर्ण व प्रशिक्षित अभियंते आणि कर्मचाऱ्यांकडून चालवले जाते आणि त्यांची देखभाल केली जाते.

9. मुंबई परवाना क्षेत्रातील पारेषण यंत्रणा "आयलँडिंग" सुविधेसह येते. त्यामुळे मुंबईबाहेरील ग्रिड बंद झाल्यास मुंबई ग्रिड वेगळे होते आणि त्यामुळे मुंबईतील ग्राहकांना विनाअडथळा वीजपुरवठा मिळतो.

10. पारेषण नेटवर्कच्या वाहिन्या, स्विचगियर आणि ट्रान्सफॉर्मर्स अशा महत्त्वाच्या घटकांच्या संरक्षणासाठी अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. टाटा पॉवर-टीचे पारेषण वाहिनी नेटवर्क जवळपास १३१५ सर्किट किमीचे आहे आणि त्यात एन-१ आधाराने ११० केव्ही

आणि २२० केव्ही ओव्हरहेड वाहिन्या व भूमिगत वाहिन्या समाविष्ट होतात. बहुवार्षिक वीजदर (एमवायटी) याचिका दाखल करण्याच्या दिवसापर्यंत एकूण २९ पारेषण रिसिव्हिंग स्टेशन्स स्थापित केलेली आहेत आणि त्यांची एकूण पारेषण क्षमता ११११९ एमव्हीएची आहे.

11. लोकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देऊन टाटा पॉवर-टीने कायमच तंत्रज्ञानाच्या बदलांशी आणि भाराच्या वाढीशी सुसंगती राखली आहे. पारेषण वाहिन्यांच्या आणि ट्रान्सफॉर्मर्सच्या क्षमतेतील वाढ, स्विचगिअरची भर, अद्ययावत ऑपरेटिंग आयटी यंत्रणांचा समावेश, दीर्घकालीन मालमत्ता नादुरूस्त होण्यापूर्वी त्या बदलल्या जाणे या गोष्टींचे उत्तम नियोजन आणि रचना आधीच केले जाते. कार्यान्वयनातील सर्वोच्च दर्जाची सुरक्षितता आणि पारेषण जाळ्यांची विश्वासार्हता यांची खात्री पटवण्यासाठी त्यांची अंमलबजावणीही केली जाते.

12. पारेषण वाहिन्या आणि उपकरणांच्या स्थानिक आणि मानवी कार्यान्वयनाखेरीज टाटा पॉवरने आपल्या सर्व रिसिव्हिंग केंद्रांच्या प्रत्यक्ष स्वरूपातील दूरस्थ निरीक्षण आणि नियंत्रणासाठी संपूर्ण पारेषण वाहिन्यांच्या जाळ्यात "निरीक्षण नियंत्रण आणि माहिती ताबा यंत्रणा" (स्काडा) स्थापित केली आहे आणि ती पॉवर सिस्टम कंट्रोल सेंटर (पीएससीसी) कडून चालवली जाते. यामुळे वीजपुरवठा बंद झाल्यास दूरस्थ कार्यान्वयनाद्वारे वेगवान कार्यान्वयन होते आणि पारेषण यंत्रणा वापरकर्त्यांपर्यंत (टीएसयू) पोहोचण्याचा वेळ कमी होतो.

13. टाटा पॉवर-टी ही सुरक्षितता, सामाजिक जबाबदारी आणि पर्यावरण संवर्धन यांच्यासाठी कटिबद्ध आहे. या बाबतीत दर वर्षी मुंबईतील विविध कार्यान्वयन ठिकाणी अनेक उपक्रम यशस्वीरित्या आयोजित करून त्यांची अंमलबजावणी केली जाते.

14. टाटा पॉवर-टी अडथळा आणणाऱ्या घटनांचे व्यवस्थापन अत्यंत काळजीपूर्वक आणि जास्तीत-जास्त वेगाने करण्याचा प्रयत्न करते आणि ती मानवी जीव वाचवण्याला सर्वाधिक प्राधान्य देऊन त्यानंतर पर्यावरणाच्या नुकसानाचा विचार करते आणि मग आर्थिक नुकसान बघते. भूकंप, पूर, आग, मोठी संयंत्रे अचानक बंद पडणे, दंगली आणि दहशतवादी हल्ला यांच्यासारख्या आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन योजना आणि आपत्कालीन व्यवस्थापन चमू अस्तित्वात आहे.

15. टाटा पॉवर-टीच्या पारेषण यंत्रणांची व्याप्ती आणि प्रसार यांचा थोडक्यात सारांश खालीलप्रमाणे आहेः

**तक्ता १: टाटा पॉवर-टी नेटवर्क तपशील**

| तपशील | आर्थिक वर्ष २०२२-२३ (प्रत्यक्ष) | आर्थिक वर्ष २०२३-२४ (प्रत्यक्ष) | आर्थिक वर्ष २०२४-२५ (प्रस्तावित)) |
|---|---|---|---|
| **पारेषण वाहिनीची लांबी (सर्किट किमी.)** | **१२६८.५९** | **१३१५.३७** | **१३१७.५२** |
| **उपकेंद्रांची संख्या (संख्या)** | **२९** | **२९** | **२९** |
| २२० केव्ही | १३ | १३ | १३ |
| ११० केव्ही | १६ | १६ | १६ |
| **उपसाधन संचांची एकूण संख्या (संख्या)** | **१५६७** | **१६०४** | **१६४८** |
| ६६ केव्हीपेक्षा जास्त, पण ४०० केव्हीपेक्षा कमी | ४९३ | ४९६ | ४९१ |
| ६६ केव्ही आणि त्यापेक्षा कमी | १०७४ | ११०८ | ११५७ |
| **ट्रान्सफॉर्मेशन क्षमता (एमव्हीए)** | **१०३६८.५** | **१०६१८.५** | **१११९८.५** |
| २२० केव्ही | ५१३० | ५३८० | ५८८० |
| ११० केव्ही | ५२३९ | ५२३९ | ५२३९ |

16. पारेषण वाहिनी उपलब्धता - टाटा पॉवर-टी मागील अनेक वर्षांपासून ९९.४५ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त ग्रिडची उपलब्धता साध्य करत आहे. उच्च ग्रिड उपलब्धतेमुळे टीएसयूंना आणि परिणामात्मक मुंबई परवाना क्षेत्रातील अंतिम ग्राहकांना वीजपुरवठ्यातील विश्वासार्हता वाढते. टाटा पॉवर-टीमधील ग्रिडची उपलब्धता टीएसयूसोबत समन्वय साधून नियोजित पद्धतीने वीजपुरवठा खंडित होणे, सक्तीने वीजपुरवठा खंडित होणे आणि वारंवार खंडित होणे टाळण्यासाठी उपसाधन संच आणि साधनांच्या प्रभावी प्रतिबंधात्मक देखभाल करून साध्य केली जाते.

**तक्ता २: टाटा पॉवर-टी नेटवर्कची पारेषण ग्रिड उपलब्धता**

| आर्थिक वर्ष | टाटा पॉवर-टी ग्रिड उपलब्धता टक्क्यांमध्ये |
|---|---|
| आर्थिक वर्ष २०१९-२० | ९९.७५ टक्के |
| आर्थिक वर्ष २०२०-२१ | ९९.८९ टक्के |
| आर्थिक वर्ष २०२१-२२ | ९९.८७ टक्के |
| आर्थिक वर्ष २०२२-२३ | ९९.९२ टक्के |
| आर्थिक वर्ष २०२३-२४ | ९९.९२ टक्के |

### 1.3. दाखल केलेल्या एमवायटी याचिकेअंतर्गत सादरीकरणे

17. टाटा पॉवर-टीने प्रस्तुत याचिकेत खाली दिल्याप्रमाणे विविध वर्षांसाठी खालील बाबी सादर केल्या आहेतः

- एमईआरसी (एमवायटी) विनियम २०१९ नुसार आर्थिक वर्ष २०२२-२३ आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी अचूक समायोजन
- एमईआरसी (एमवायटी) विनियम २०१९ नुसार आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी तात्पुरते अचूक समायोजन
- आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या शेवटी तफावत / (अतिरिक्त)
- एमईआरसी (एमवायटी) विनियम २०२४ नुसार आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० साठी प्रस्तावित एकूण महसूल आवश्यकता.
- नियमन आणि निर्देशांच्या पालनाची स्थिती

### 1.4. भांडवलीकरण

18. टाटा पॉवर-टीकरिता आर्थिक वर्ष २०२२-२३, आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी प्रत्यक्ष भांडवली खर्च, आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी अंदाजित भांडवली खर्च आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० साठी प्रस्तावित भांडवली खर्च खालील तक्त्यात दर्शवल्याप्रमाणे आहे:

**तक्ता ३: भांडवली खर्च**

| वर्गवारी | भांडवली खर्च कोटी रूपयांमध्ये | | |
|---|---|---|---|
| | आर्थिक वर्ष २०२२-२३ (प्रत्यक्ष) | आर्थिक वर्ष २०२३-२४ (प्रत्यक्ष) | आर्थिक वर्ष २०२४-२५ (प्रस्तावित)) |
| डीपीआर | ४६४.२९ | ६९५.१४ | १३६७.१२ |
| नॉन-डीपीआर | ९०.५९ | ८९.२६ | ९०.४५ |
| **एकूण** | **५५४.८८** | **७८४.४०** | **१४५७.५७** |

| वर्गवारी | भांडवली खर्च कोटी रूपयांमध्ये (प्रस्तावित) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | आर्थिक वर्ष २०२५-२६ | आर्थिक वर्ष २०२६-२७ | आर्थिक वर्ष २०२७-२८ | आर्थिक वर्ष २०२८-२९ | आर्थिक वर्ष २०२९-३० |
| डीपीआर | ४१०६.०० | ३१६१.५५ | ९५३.०० | १२१५.०० | १२९०.०० |
| नॉन-डीपीआर | ०.०० | १५.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| **एकूण** | **४१०६.००** | **३१७६.५५** | **९५३.००** | **१२१५.००** | **१२९०.००** |

19. टाटा पॉवर टी करिता आर्थिक वर्ष २०२२-२३, आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी प्रत्यक्ष भांडवलीकरण, आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी अंदाजित भांडवलीकरण आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० साठी प्रस्तावित भांडवलीकरण खालील तक्त्यात दर्शवल्याप्रमाणे आहेः

**तक्ता ४: भांडवलीकरण**

| वर्गवारी | भांडवलीकरण कोटी रूपयांमध्ये |
|---|---|

| | आर्थिक वर्ष २०२२-२३ (प्रत्यक्ष) | आर्थिक वर्ष २०२३-२४ (प्रत्यक्ष) | आर्थिक वर्ष २०२४-२५ (प्रस्तावित)) |
|---|---|---|---|
| डीपीआर | ७३८.५६ | ६४८.२६ | ४७४.२४ |
| नॉन-डीपीआर | १०३.३८ | ९७.५२ | ९१.०८ |
| **एकूण** | **८४१.९४** | **७४५.७८** | **५६५.३३** |

| **वर्गवारी** | **भांडवलीकरण कोटी रूपयांमध्ये** | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **आर्थिक वर्ष २०२५-२६** | **आर्थिक वर्ष २०२६-२७** | **आर्थिक वर्ष २०२७-२८** | **आर्थिक वर्ष २०२८-२९** | **आर्थिक वर्ष २०२९-३०** |
| डीपीआर | २३३७.०० | ४३९३.५५ | २३०६.०० | ६१५.०० | २०९०.०० |
| नॉन-डीपीआर | ०.०० | १५.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| **एकूण** | **२३३७.००** | **४४०८.५५** | **२३०६.००** | **६१५.००** | **२०९०.००** |

20. आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० या कालावधीत अंमलबजावणी करण्यात येणारे प्रमुख प्रकल्प एसयटीयूने प्रकाशित केलेल्या नवीन १० वर्षाच्या आराखड्यासह प्रामुख्याने खालील मोठ्या वर्गवारींमध्ये प्रस्तावित करण्यात येत आहेत:

   a. नवीन ईएचव्ही उपकेंद्रांची स्थापना

   b. पॉवर ट्रान्सफॉर्मर्सची स्थापना/बदली

   c. आंतरजोडण्या, यंत्रणा विश्वासार्हतेच्या आवश्यकतांसाठी रिॲक्टर्सची स्थापना

   d. जुन्या झालेल्या तेलाने भरलेल्या ईएचव्ही केबल्सच्या जागी एक्सएलपीई केबल्स लावणे.

   e. कार्यान्वयनाच्या विश्वासार्हतेसाठी एआयएसपासून जीआयएसमध्ये रूपांतर.

   f. केंद्रीकृत बीईएसएसची स्थापना

### 1.5. आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी अचूक समायोजन

21. टाटा पॉवर-टी करिता आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी खर्चाचे वर्गीकरण नफा आणि तोट्याच्या वाटपामुळे होणाऱ्या समायोजनासह खालीलप्रमाणे आहे:

**तक्ता ५: आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी निव्वळ वार्षिक पारेषण शुल्क आणि तफावत**

*रुपये कोटी*

| अनु.क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०२२-२३ | | |
|---|---|---|---|---|
| | | एमटीआर आदेश | एप्रिल-मार्च (लेखापरीक्षित केलेले) | अचूक समायोजन आवश्यकता |
| | | (a) | (b) | (c ) = (b)-(a) |
| १ | कार्यान्वयन आणि देखभाल खर्च | २१८.८४ | २६४.२१ | ४५.३७ |
| २ | घसारा खर्च | २२३.६० | २२०.१३ | (३.४७) |
| ३ | कर्ज भांडवलावर व्याज | १३०.९६ | १४२.४२ | ११.४७ |
| ३.१ | पुनर्वित्तपुरवठा आणि इतर आर्थिक शुल्क | - | - | - |
| ४ | खेळत्या भांडवलावर आणि ग्राहक सुरक्षा ठेवींवर व्याज | १६.१५ | ५.३६ | (१०.७९) |
| ५ | आयकर | - | - | - |
| ६ | आपत्कालीन साठ्यांप्रती योगदान | १२.६५ | १२.७१ | ०.०६ |
| **७** | **एकूण महसूली खर्च** | **६०२.१९** | **६४४.८३** | **४२.६४** |
| ८ | अधिक: भाग भांडवलावरील परतावा | २४०.४९ | २६९.०७ | २८.५८ |
| **९** | **एकूण महसूली आवश्यकता** | **८४२.६८** | **९१३.९०** | **७१.२२** |
| १० | वजा: दरेत्तर उत्पन्न | ४३.६८ | ५१.३२ | ७.६४ |
| **११** | **पारेषणमधून एकूण महसूली आवश्यकता** | **७९९.०१** | **८६२.५८** | **६३.५८** |
| **१२** | **पारेषण दरामधून महसूल** | **८१६.२३** | **८१६.०३** | **-०.१९** |
| **१३** | **महसूल तफावत / (अतिरिक्त) [१७-१८]** | **-१७.२२** | **४६.५५** | **६३.७७** |

22. उक्तनिर्देशित तक्त्यातून दिसून येते की आर्थिक वर्ष २०२२-२३ साठीची तफावत रक्कम **४६.५५ कोटी रूपये** आहे, जी आर्थिक वर्ष २०२२-२३ दरम्यान कमावलेला महसूल आणि फक्त २०२२-२३ या आर्थिक वर्षातील खर्चामधील तफावतीच्या स्वरूपात मोजण्यात आली आहे.

## 1.6. आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी अचूक समायोजन

23. टाटा पॉवर-टी करिता आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी खर्चाचे वर्गीकरण नफा आणि तोट्याच्या वाटपामुळे होणाऱ्या समायोजनासह खालीलप्रमाणे आहे:

**तक्ता ६: आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी निव्वळ वार्षिक पारेषण शुल्क आणि तफावत**

| अनु.क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०२३-२४ | | |
|---|---|---|---|---|
| | | एमटीआर आदेश(मंजूर) | एप्रिल-मार्च (लेखापरीक्षित केलेले) | अचूक समायोजन आवश्यकता |
| | | (a) | (b) | (c ) = (b)-(a) |
| १ | कार्यान्वयन आणि देखभाल खर्च | २२८.३८ | २७२.८१ | *४४.४३* |
| २ | घसारा खर्च | २५२.०२ | २५४.४५ | *२.४३* |
| ३ | कर्ज भांडवलावर व्याज | १४९.४५ | १९०.८८ | *४१.४३* |
| ३.१ | पुनर्वित्तपुरवठा आणि इतर आर्थिक शुल्क | - | ०.२२ | *०.२२* |
| ४ | खेळत्या भांडवलावर आणि ग्राहक सुरक्षा ठेवींवर व्याज | १८.२९ | २०.५० | *२.२०* |
| ५ | आयकर | - | - | - |
| ६ | आपत्कालीन साठ्यांप्रती योगदान | १४.७१ | १४.६८ | *(०.०३)* |
| **७** | **एकूण महसूली खर्च** | **६६२.८५** | **७५३.५४** | **९०.६९** |
| ८ | अधिक: भाग भांडवलावरील परतावा | २६९.६९ | ३०४.१७ | *३४.४८* |
| **९** | **एकूण महसूली आवश्यकता** | **९३२.५४** | **१,०५७.७१** | ***१२५.१६*** |
| १० | वजा: दरेत्तर उत्पन्न | ४८.०४ | ३४.३९ | *(१३.६५)* |
| ११ | अधिक: पुनरावलोकन आदेशाचा प्रभाव | ४.७८ | ४.७८ | - |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | अधिक: ४०० केव्ही खारघर विक्रोळीसाठी भरपाई | ५४.८७ | ५४.८७ | - |
| १३ | अधिक: मागील वसुली | (१८.४६) | (१८.४६) | - |
| **१७** | **पारेषणमधून एकूण महसूली आवश्यकता** | **९२५.७०** | **१,०६४.५१** | ***१३८.८२*** |
| **१८** | **पारेषण दरामधून महसूल** | **९२५.७०** | **९४०.७९** | ***१५.०९*** |
| **१९** | **महसूल तफावत / (अतिरिक्त) [१७-१८]** | **०.००** | **१२३.७२** | ***१२३.७२*** |

24. उक्तनिर्देशित तक्त्यातून दिसून येते की आर्थिक वर्ष २०२३-२४ साठीची तफावत रक्कम **१२३.७२ कोटी रूपये** आहे, जी आर्थिक वर्ष २०२३-२४ दरम्यान कमावलेला महसूल आणि फक्त २०२३-२४ या आर्थिक वर्षातील खर्चामधील तफावतीच्या स्वरूपात मोजण्यात आली आहे.

### 1.7. आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी तात्पुरते अचूक समायोजन

25. आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी तात्पुरती तफावत / (अतिरिक्त) खाली दिल्याप्रमाणे काढण्यात आली आहे:

**तक्ता ८: आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी निव्वळ वार्षिक पारेषण शुल्क आणि तफावत**

| अनु.क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०२४-२५ | | |
|---|---|---|---|---|
| | | एमटीआर आदेश(मंजूर) | एप्रिल-मार्च (लेखापरीक्षित केलेले) | अचूक समायोजन आवश्यकता |
| | | (a) | (b) | (c ) = (b)-(a) |
| १ | कार्यान्वयन आणि देखभाल खर्च | २३९.२५ | २६१.३७ | *२२.१२* |
| २ | घसारा खर्च | २६८.९७ | २८०.७२ | *११.७५* |
| ३ | कर्ज भांडवलावर व्याज | १५१.६८ | २०८.०९ | *५६.४१* |
| ३.१ | पुनर्वित्तपुरवठा आणि इतर आर्थिक शुल्क | - | - | - |
| ४ | खेळत्या भांडवलावर आणि ग्राहक सुरक्षा ठेवींवर व्याज | १८.९२ | २१.३६ | *२.४४* |
| ५ | आयकर | - | - | - |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | आपत्कालीन साठ्यांप्रती योगदान | १६.१३ | १६.४८ | ०.३५ |
| **७** | **एकूण महसूली खर्च** | **६९४.९४** | **७८८.०२** | **९३.०८** |
| ८ | अधिक: भाग भांडवलावरील परतावा | २८७.१२ | ३०१.७६ | १४.६४ |
| **९** | **एकूण महसूली आवश्यकता** | **९८२.०६** | **१,०८९.७८** | **१०७.७२** |
| १० | वजा: दरेत्तर उत्पन्न | ५२.८५ | ३४.३९ | (१८.४६) |
| १३ | अधिक: मागील वसुली | (३.५२) | (३.५२) | - |
| **१७** | **पारेषणमधून एकूण महसूली आवश्यकता** | **९२५.७०** | **१,०५१.८७** | **१२६.१७** |
| **१८** | **पारेषण दरामधून महसूल** | **९२५.७०** | **९२५.७१** | **०.०१** |
| **१९** | **महसूल तफावत / (अतिरिक्त) [१७-१८]** | **०.००** | **१२६.१६** | **१२६.१६** |

26. उक्तनिर्देशित तक्त्यातून दिसून येते की आर्थिक वर्ष २०२४-२५ साठीची तफावत रक्कम **१२६.१६ कोटी रूपये** आहे, जी आर्थिक वर्ष २०२४-२५ दरम्यान कमावलेला महसूल आणि फक्त २०२४-२५ या आर्थिक वर्षातील प्रस्तावित खर्चामधील तफावतीच्या स्वरूपात मोजण्यात आली आहे.

### 1.8. मागील वसुलींसह एकूण महसूल आवश्यकता

27. आर्थिक वर्ष २०२२-२३, आर्थिक वर्ष २०२३-२४ ची प्रत्यक्ष तफावत / (अतिरिक्त), आर्थिक वर्ष २०२४-२५ ची तात्पुरती तफावत / (अतिरिक्त) पाहता भविष्यातील वीजदरासाठी मागील वसुलींची एकूण रक्कम खालीप्रमाणे सादर करण्यात आली आहे:

**तक्ता ९: भविष्यातील वीजदरांसाठी मागील वसुलींची रक्कम**

*रूपये कोटी*

| तपशील | | आर्थिक वर्ष २०२२-२३ | आर्थिक वर्ष २०२३-२४ | आर्थिक वर्ष २०२४-२५ | आर्थिक वर्ष २०२५-२६ |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभीची शिल्लक | अ | | ४६.५५ | १८७.४९ | ३१३.६५ |
| वर्षादरम्यान तफावत /(अतिरिक्त) वाढ | ब | ४६.५५ | १२३.७२ | १२६.१६ | - |
| एमवायटी आदेश २०२२ च्या २१७ मध्ये आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या एआआरमध्ये समायोजित करण्यात आलेली आर्थिक वर्ष २०२२-२३ ची | क | - | (१७.२२) | - | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| तात्पुरती महसूल तफावत / (अतिरिक्त) | | | | | |
| मागील वसुलीवर व्याज | ड | | | | ५६.७२ |
| शेवटची शिल्लक | ई=(अ+ब-क+ड) | ४६.५५ | १८७.४९ | ३१३.६५ | ३७०.३७ |
| **आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये एकूण मागील वसुली** | **फ=(ड+ई)** | | | | **३७०.३७** |

28. व्याजाचे केलेले गणन खालील तक्त्यात दर्शवण्यात आले आहे:

**तक्ता १०: मागील वसुलींसाठी गणन केलेले व्याज**

*रूपये कोटी*

| **तपशील** | | **आर्थिक वर्ष २०२२-२३** | **आर्थिक वर्ष २०२३-२४** | **आर्थिक वर्ष २०२४-२५** | **आर्थिक वर्ष २०२५-२६** |
|---|---|---|---|---|---|
| **पुढे नेण्याचा खर्च दर** | **अ** | **९.३० टक्के** | **१०.०७ टक्के** | **१०.५० टक्के** | **१०.५० टक्के** |
| प्रारंभीची शिल्लक | ब | - | ४६.५५ | १८७.४९ | ३१३.६५ |
| वर्षदरम्यान वाढ | क | ४६.५५ | १४०.९४ | १२६.१६ | (३१३.६५) |
| वजा प्रोत्साहन | ड | - | - | - | - |
| अंतिम शिल्लक | ई=(ब+क-ड) | ४६.५५ | १८७.४९ | ३१३.६५ | - |
| सरासरी शिल्लक | फ= सरासरी (अ,ई) | २३.२८ | ११७.०२ | २५०.५७ | १५६.८३ |
| **पुढे नेण्याचा खर्च** | **ज=अ*फ** | **२.१६** | **११.७८** | **२६.३१** | **१६.४७** |
| **एकूण पुढे नेण्याचा खर्च#** | **च** | | | | **५६.७२** |

*# आर्थिक वर्ष २०२२-२३ ते आर्थिक वर्ष २०२५-२६ पर्यंत पुढे नेण्याच्या खर्चाची एकूण बेरीज*

### 1.9. आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० पर्यंत प्रस्तावित एकूण महसूल आवश्यकता

29. सादर केलेल्या याचिकेत देण्यात आलेल्या विविध घटांवरील अंदाजांनुसार आणि मागील विभागामध्ये गणन करण्यात आलेल्या गेल्या वर्षीच्या तफावत / (अतिरिक्त) चा विचार

करता टाटा पॉवर-टीसाठी आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० पर्यंतची एकूण महसूल आवश्यकता खाली दिल्याप्रमाणे आहे:

**तक्ता ११: आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० पर्यंत प्रस्तावित एकूण महसूल आवश्यकता**

*रूपये कोटी*

| तपशील | आर्थिक वर्ष २०२५-२६ (प्रस्तावित) | आर्थिक वर्ष २०२६-२७ (प्रस्तावित) | आर्थिक वर्ष २०२७-२८ (प्रस्तावित) | आर्थिक वर्ष २०२८-२९ (प्रस्तावित) | आर्थिक वर्ष २०२९-३० (प्रस्तावित) |
|---|---|---|---|---|---|
| कार्यान्वयन आणि देखभाल खर्च | ३००.६१ | ३४०.४२ | ३८०.३६ | ४१२.४२ | ४४५.७२ |
| दीर्घकालीन कर्ज भांडवलावर व्याज | २७१.६० | ४४७.३९ | ६०९.७६ | ६४३.५१ | ६६५.२३ |
| खेळत्या भांडवलावर व्याज | ३३.५३ | ३७.२९ | ४९.०५ | ५४.४१ | ५७.६६ |
| इतर आर्थिक शुल्क | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| घसारा | ३४२.३१ | ४८०.५९ | ६१८.२३ | ६७८.११ | ७३३.५६ |
| समभागावर परतावा | ४०१.५७ | ५५८.४० | ७१४.५२ | ७८२.४३ | ८४५.३२ |
| आपत्कालीन साठ्यांप्रती योगदान | १८.०३ | २३.८७ | ३४.८९ | ४०.६६ | ४२.२० |
| **वार्षिक पारेषण शुल्क** | **१३६७.६४** | **१८८७.९६** | **२४०६.८२** | **२६११.५४** | **२७८९.६८** |
| वजा: दरेतर उत्पन्न | ३६.११ | ३७.९२ | ३९.८१ | ४१.८० | ४३.८९ |
| **एकूण पारेषण शुल्क** | **१३३१.५३** | **१८५०.०५** | **२३६७.०१** | **२५६९.७३** | **२७४५.७९** |
| पुनरावलोकन आदेशाचा प्रभाव | ६६.९७ | | | | |
| प्रस्तुत याचिकेत स्थापित करण्यात आलेल्या मागील परवानगी न दिलेल्या भांडवलीकरणाचा प्रभाव (थर्ड पार्टी असेट व्हेरिफिकेशन) | ८.४६ | | | | |
| आर्थिक वर्ष २०२४-२५ पर्यंत मागील वसुली | ३७०.३७ | | | | |
| **एकूण एआरआर** | **१७७७.३४** | **१८५०.०५** | **२३६७.०१** | **२५६९.७३** | **२७४५.७९** |

## 1.10. माननीय आयोगाला विनंती

उक्तनिर्देशित बाबींचा विचार करून याचिकाकर्ते माननीय आयोगाकडे विनंती करतात की:

- प्रस्तुत याचिकेत एमवायटी विनियम २०१९ नुसार गणन करण्यात आलेले आर्थिक वर्ष २०२२-२३, आर्थिक वर्ष २०२३-२४ चे अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी तात्पुरते अचूक समायोजन आणि मागील तफावत / (अतिरिक्त) मान्य करण्यात यावे.
- प्रस्तुत याचिकेत एमवायटी विनियम, २०२४ नुसार गणन करण्यात आलेले आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० साठी प्रस्तावित एकूण महसूल आवश्यकता मान्य करण्यात यावे.
- खालील कारणांमुळे प्रस्तुत याचिकेत गणन करण्यात आलेली मागील वसुली मान्य करण्यात यावी:
    - प्रकरण क्रमांक २०२३ चा ९१ मधील ७ मार्च २०२४ चे पुनरावलोकन आदेश;
    - मागील दर आदेशांमध्ये मान्यता न दिलेले, पण प्रस्तुत याचिकेत पुनर्स्थापित केलेले भांडवलीकरण;
- कोणत्याही बाबी चुकीने वगळण्यात आल्यास/ झालेल्या चुका/ समायोजनातील फरक/ त्रुटी क्षमापित कराव्यात आणि टाटा पॉवर-टीला प्रस्तुत सादरीकरणानंतर भर टाकण्याची/ बदलण्याची/ सुधारण्याची/ फेरबदल करण्याची अनुमती द्यावी आणि पुढील तारखेला आवश्यकतेनुसार आणखी बाबी समाविष्ट करण्याची अनुमती द्यावी;
- माननीय आयोगाला प्रकरणाची तथ्ये व परिस्थिती यांचा विचार करून योग्य आणि आवश्यक वाटतील असे इतर पुढील आणि कोणतेही आदेश पारित करावे.

-स्वाक्षरी-

(**विद्याधर एच. वागळे**)

प्रमुख नियामक (पश्चिम विभाग)

दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड